RNI Regd. No. 72105/99 ■ सातारा

मराठी माणसाचा मानदंड

■ www.rajdand.com Youtube, FB, Insta, Twitter, Koo ■ rajdandlive

# राजदंड

■ वर्ष २५, ■अंक १८४■, सोमवार, ११ मार्च २०२४ पश्चिम महाराष्ट्र ■ पाने ८ (सुप्रभात) ■ किंमत रू ५/-

# कोल्हापूर विमानतळ टर्मिनल इमारतीचे पंतप्रधानाच्या हस्ते उद्घाटन

## मुख्यमंत्र्याची प्रमुख उपस्थिती

**कोल्हापूर :** कोल्हापूर विमानतळ विस्तारीकरणाच्या अनुषंगाने दर्शनी भागात बांधण्यात आलेल्या टर्मिनल इमारतीचे उद्घाटन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते ऑनलाईन पद्धतीने करण्यात आले. यावेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची प्रमुख उपस्थिती होती.

उद्योग पर्यटनाला चालना देण्यासाठी कोल्हापूर विमानतळाची विस्तारीकरण करण्यात येत आहे. त्या अंतर्गत कोल्हापूर विमानतळावर नवीन टर्मिनस इमारत भव्य दिव्य दगडी स्वरूपात उभारण्यात आली आहे .या इमारतीला कोल्हापूरच्या ऐतिहासिक परंपरेला साजेशी असे दर्शनी रूप देण्यात आले आहे. यामुळे कोल्हापूरच्या सौंदर्यात आणखीन भर पडली आहे. विमानतळाच्या मुख्य प्रवासी कक्षात छत्रपती शिवरायांच्या राजदरबाराचे भव्य असे पहिले चित्र प्रवासी दालनात संपूर्ण भिंतीवरच रेखाटण्यात आले आहे. यासह छत्रपती शाहू महाराज, छत्रपती राजाराम महाराज, करवीरच्या संस्थापिका रणरागिनी ताराराणी, यांची तैलचित्रे विमान तळावर अत्यंत खूबिनी वापरण्यात आले आहे. या इमारतीत कोल्हापूरच्या निसर्ग सौंदर्याचे अद्भुत दर्शन घडविले आहे कोल्हापुरात आगमन होणाऱ्या प्रवाशांना करवीर निवासिनी श्री अंबाबाई, श्री ज्योतिबा याचे दर्शन होणार आहे त्याचबरोबर बॅग्ज क्लोज मध्ये अंबाबाई आणि जोतिबाच्या भव्य प्रतिमा लावण्यात आलेल्या आहेत.

यासह रंकाळा, पन्हाळा ,खिद्रापूरचे मंदिर अशा कोल्हापूरच्या पर्यटनाचे दर्शन घडवणाऱ्या भव्य कलाकृतीने प्रवाशांचे स्वागत होणार आहे .आधुनिक सुविधा सह सज्ज असलेल्या या इमारतीचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते व नागरी विमान वाहतूक मंत्री ज्योतिराज्य शिंदे यांच्या प्रमुख उपस्थितीत ऑनलाईन दारी उद्घाटन करण्यात आले .हा उद्घाटन सोहळा पाहण्यासाठी भव्य स्क्रीन लावण्यात आलेल्या होत्या. तसेच टर्मिनसला आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आली होती. हवाई सेवा विस्तारीकरणासाठी केलेल्या प्रयत्नाला एक प्रकारे यश आले असून त्याचे समाधान कोल्हापूर वासियांच्या चेहऱ्यावर आज दिसून येत होते. हा अद्भुतपूर्व सोहळा डोळ्यात टिपण्यासाठी नागरिकांनी मोठ्या प्रमाणात हजेरी लावली होती.

विमानतळावर टर्मिनल इमारतीच्या उद्घाटन सोहळयानंतर मुख्यमंत्री शिंदे यांनी खासदार संजय मंडलिक, खासदार धैर्यशील माने, राज्य नियोजन मंडळाचे कार्यकारी अध्यक्ष राजेश क्षीरसागर आमदार प्रकाश आबिटकर, आमदार राजेंद्र पाटील यड्रावकर, माजी आमदार चंद्रदीप नरके यांच्यासोबत काही वेळ चर्चा केली. शिवसेनेतील नेतेमंडळीची काही मिनिटाची ही भेट राजकीय चर्चेची ठरली.



**कोल्हापूर विमानतळ येथील टर्मिनल इमारतीच्या लोकार्पण सोहळयासाठी मुख्यमंत्री शिंदेचे दुपारी बारा वाजण्याच्या सुमारास व्यासपीठावर आगमन झाले. तोपर्यंत इतर नेत्यांची भाषणे झाली होती. मुख्यमंत्री शिंदे यांच्या भाषणाला सुरूवात झाली. दरम्यान उत्तरप्रदेश येथील आझमगढ येथे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते देशभरातील विविध विकास कामांच्या लोकार्पण सोहळयाला सुरुवात झाली. यामुळे मुख्यमंत्रयांनी दोन मिनिटात आपले भाषण आटोपले, कोल्हापूर विमानतळाच्या विकासकामांना शुभेच्छा दिल्या.**

**जवळपास पंचवीस मिनिटे पंतप्रधान मोदी यांचे ऑनलाइन भाषण झाले. यानंतर मुख्यमंत्री शिंदे, पालकमंत्री हसन मुश्रीफ, खासदार धनंजय महाडिक, खासदार संजय मंडलिक, धैर्यशील माने, आमदार प्रकाश आबिटकर, आमदार राजेंद्र पाटील यड्रावकर, आमदार प्रकाश आवाडे, राज्य नियोजन मंडळाचे कार्यकारी अध्यक्ष राजेश क्षीरसागर, माजी आमदार चंद्रदीप नरके, माजी आमदार अमल महाडिक, समरजितसिंह घाटगे यांनी विमानतळ प्राधिकरणच्या अधिकाऱ्यासोबत टर्मिनल इमारतीची पाहणी केली. इमारत पाहणी सुरु असताना पालकमंत्री मुश्रीफ हे पुढील कार्यक्रमासाठी रवाना झाले.**

यावेळी पालकमंत्री हसन मुश्रीफ, खासदार धनंजय महाडिक, खासदार संजय मंडलिक, धैर्यशील माने, आमदार प्रकाश आबिटकर, आमदार राजेंद्र पाटील यड्रावकर, आमदार प्रकाश आवाडे, राज्य नियोजन मंडळाचे कार्यकारी अध्यक्ष राजेश क्षीरसागर, माजी आमदार चंद्रदीप नरके, माजी आमदार अमल महाडिक, समरजितसिंह घाटगे आदी उपस्थित होते. मुख्यमंत्री व अनय नेत्यांनी टर्मिनलची नूतन इमारत पाहिली. यानंतर मुख्यमंत्र्यांनी, आमदार प्रकाश आबिटकर कुठे आहेत ? अशी विचारणा केली. टर्मिनल इमारतीमध्येच एका बाजूला मुख्यमंत्री शिंदे यांनी आमदार आबिटकर, खासदार मंडलिक, खासदार माने, आमदार यड्रावकर, राज्य नियोजन मंडळाचे कार्यकारी अध्यक्ष क्षीरसागर या साऱ्यांशी मुख्यमंत्र्यांनी काही वेळ चर्चा केली. त्यानंतर मुख्यमंत्री पुढील कार्यक्रमासाठी विमानाने रवाना झाले.

## पंतप्रधान मोदी यांच्याकडून मंगळवारी रेल्वेच्या विविध प्रकल्पाचे उद्घाटन होणार



**नागपूर :** पंतप्रधाननरेंद्र मोदीयांच्या हस्ते मंगळवारी, १२ मार्चला रेल्वेशी संबंधित विदर्भातील बडनेरा, अकोला आणि नागभिडमधील विविध प्रकल्पाचे उद्घाटन आणि लोकार्पण होणार आहे.

विशेष म्हणजे, २६ फेब्रुवारीला पंतप्रधानांनी विदर्भातील रेल्वेच्या अनेक विकास कामांचे भूमीपूजन आणि लोकार्पण केल्यानंतर २८ फेब्रुवारीला वर्धा यवतमाळ नांदेड रेल्वे मार्गावरील वर्धा ते कळंब या रेल्वेगाडीला हिरवा झेंडा दाखविला होता.

यावेळी १२ मार्चला पंतप्रधान मोदी व्हिडिओ कॉन्फरन्सद्वारे देशभरात अनेक ठिकाणी एकाच वेळी आयोजित कार्यक्रमांमध्ये ८५ हजार कोटींहून अधिक किमतीच्या विविध रेल्वे प्रकल्पांचे उद्घाटन, लोकार्पण करणार आहेत.

याचवेळी ते वेगवेगळ्या मार्गावर धावणाऱ्या १० दे भारत ट्रेन्सला हिरवा झेंडा दाखवतील. पंतप्रधानांकडून ज्या प्रकल्पाचे उद्घाटन होणार आहे, त्यात विदर्भातील बडनेरा येथील वॅगन दुरुस्ती कार्यशाळेचे, अकोला येथील रेल कोच रेस्टॉरेंटचे आणि नागभीड (चंद्रपूर जिल्हा)येथील जन औषधी केंद्रांच्या उद्घाटन समारंभाचाही समावेश आहे. या कार्यक्रमाच्या संबंधाने मध्य रेल्वे आणि दक्षिण पूर्व मध्य रेल्वेच्या अधिकाऱ्यांकडून जोरदार तयारी सुरू आहे.

## आचारसंहिता लागण्यापूर्वी जीआरचा धडाका! दोन दिवसांत तब्बल २६९ शासन निर्णय

पुढील आठवड्याभरात कधीही लोकसभा निवडणुकीची आचारसंहिता लागण्याची शक्यता आहे. त्यामुळे आचारसंहिता लागण्यापूर्वी राज्य सरकारकडून जीआरचा धडाका पाहायला मिळत आहे. कारण दोन दिवसांत तब्बल २६९ शासन निर्णय) घेण्यात आले आहेत. त्यामुळे आचारसंहिता लागण्यापूर्वी कामे आटपण्याची राज्य सरकारला घाई पाहायला मिळत आहे. या जीआरमध्ये अनेक विकास कामांबद्दल निर्णय घेण्यात आले आहेत.

राज्यात आचारसंहिता लागण्यापूर्वी दोन दिवसात तब्बल २६९ शासन निर्णय घेण्यात आले आहेत. राज्य सरकारकडून घेण्यात आलेल्या निर्णयात पदस्थापना, जल प्रकल्प, कोकणातील कामे, निधींची पूर्तता अशा शासन निर्णयाचा समावेश आहे. आचारसंहितेपूर्वी शासन निर्णय जारी करून कामे आटपण्याची राज्य सरकारला घाई असल्याचे पाहायला मिळत आहे. लोकसभा निवडणुकीच्या



आचारसंहिता कुठल्याही क्षणी लागू शकते, आणि त्यामुळेच राज्य सरकारने सहा आणि सात मार्च या दोन दिवसात गतिमान पद्धतीने तब्बल २६९ शासन निर्णय जारी केले आहेत. ७ मार्च रोजी १७३ शासन निर्णय, तर सहा मार्चला ९६ शासन निर्णय जारी करण्यात आले आहेत.

निवडणुकीची आचारसंहिता लागल्यास सर्व कामे ठप्प होऊ नयेत, आणि आठ नऊ आणि दहा मार्चला सलग सुट्ट्याचा विचार करून तातडीने सहा आणि सात मार्च रोजी शासन निर्णय जाहीर केल्याची माहिती आहे. यामध्ये प्रामुख्याने निधी वितरणाचे शासन निर्णय, राज्य उत्पादन शुल्का सारख्या महत्त्वाच्या विभागातील पदस्थापना, कोकणातील काही योजनांना मान्यता देण्यासंदर्भातील शासन निर्णय यांचा समावेश यामध्ये आहे. आता यामध्ये सोमवार, मंगळवार या दोन दिवसांत मंत्रिमंडळाची बैठक घेऊन काही महत्त्वाचे निर्णय घेतली जाण्याची अपेक्षा आहे.

**निवडणुकीच्या आधी दिलेले आश्वासन पूर्ण करण्याचा प्रयत्न**

लोकसभा निवडणुकीची आचारसंहिता लागण्यास नवीन विकास कामांची घोषणा करता येत नाही. त्यामुळे राज्य सरकराने या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आचारसंहिता लागण्यापूर्वी निर्णयाचा धडाका लावला आहे. निवडणुकीच्या आधी दिलेले आश्वासन पूर्ण केल्यास निवडणुकीत त्या निमित्ताने मतदारांच्या समोर जाता यावे आणि त्यावरून प्रचार करण्यासाठी प्रत्येक निवडणुकीच्या आधी असे निर्णय घेतले जातात. यापूर्वी देखील आचारसंहिता लागण्यापूर्वी असे निर्णय घेण्यात आले आहेत. त्याचप्रमाणे आता महायुतीच्या सरकराने देखील असेच निर्णय घेतले आहेत.

## पक्षफुटीनंतर माझ्याविरोधातील कारवाईला जोर : रोहित पवार

**पुणे :** लोकसभा निवडणूक डोळ्यांसमोर ठेऊन विरोधकांवर कारवाई करण्याचा प्रयत्न सुरु आहे. आर्थिक गुन्हे शाखेकडून क्लीन चिट देण्यात आल्यानंतर कन्नड कारखानाला जप्तीची नोटीस दिली आहे. पक्षफुटीनंतर माझ्याविरोधातील कारवाईला जोर आला आहे. मला जेलमध्ये टाकण्याचा प्रयत्न केला जाईल. तरूंगात टाकले तरी माझी लढाई सुरू राहील. नुकत्याच झालेल्या अधिवेशनात पक्षाची व लोकांची बाजू मांडल्याने त्यासोबतचाच सरकारविरोधात मी लढत असल्याने ईडीने मला नोटीस पाठवली आहे, अशा शब्दांत आमदार रोहित पवार यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासह राज्य सरकारवर निशाणा साधला.

आमदार रोहित पवार पत्रकार परिषदेत बोलत होते. राष्ट्रवादी कॉग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे शहराध्यक्ष प्रशांत जगताप, प्रवक्ते विकास लंवाडे आदी उपस्थित होते. रोहित पवार म्हणाले, सोमवारी सकाळी होणाऱ्या चौकशीला हजर राहणार आहे. जप्तीची प्रक्रिया ही १८० दिवसाची असते. ही प्रक्रिया सुरु राहणार आहे. त्यामुळे चिंता करण्याची गरज नाही. बारामती ऍग्रो कंपनीत आठ हजार कर्मचारी काम करीत आहेत. त्यावर अवलंबुन ५० हजार जणांचे कुटुंब आहेत. त्यासोबतच प्रक्रिया उद्योगाशी संबंधित सुमारे तीन लाख लोक आहे. जरांडेश्वर कारखान्याला दिलेली नोटीसच बारामती ऍग्रोला कॉपी करून पाठवली आहे.

बारामती ॲग्रो लिमिटेडवर ईडीने कारवाई केली आहे. कन्नड कारखाना जप्तीची नोटीस अजून मला आलेली नाही. कामगारांनी घाबरून जाण्याची गरज नाही. आम्हाला आलेल्या नोटिशी विरोधात कोर्टात जाणार आहे. बारामती ॲग्रो लिमिटेडमध्ये काळा पैसा नाही. सर्व माहिती ईडीला दिली आहे.

ईडीचा बारामती ॲग्रो लिमिटेड विरुद्ध सुरू असलेला तपास बेकायदेशीर आहे. मुंबईतील आर्थिक गुन्हे विभागाने दोनदा तपास करून सप्टेंबर २०२० आणि जानेवारी २०२४ मध्ये फौजदारकी न्यायालयात 'सी समरी' म्हणजेच क्लोजर रिपोर्ट दाखल केला होता. ज्यात या प्रकरणात कोणताही गुन्हा घडलेला नाही, असा निष्कर्ष काढलेला आहे. तरीही ईडीने बेकायदेशीर प्रोव्हिजनल जप्ती केली आहे. देषाचे राजकारण सुरू आहे. माझ्यामुळे कुटूंबाला त्रास होत आहे. त्याबददल मी कुटूंबाची माफी मागतो असेही रोहित पवार यांनी सांगितले.



## अजित पवार आणि एकनाथ शिंदेंची पुन्हा दिल्लीवारी

### महाशक्तीकडून किती जागा मिळणार ?

महायुतीचा जागा वाटपाचा तिढा अद्याप सुटलेला नाही. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री अजित पवार जागा वाटपाबाबत ठोस निर्णय व्हावा यासाठी पुन्हा एकदा दिल्ली गाठणार आहेत. अजित पवारयांनी पुण्यातील पत्रकार परिषदेत पुन्हा एकदा दिल्लीला जाणार असल्याचे स्पष्ट केले आहे. त्यामुळे महायुतीचा जागा वाटपाचा निर्णय दिल्लीत होणार असल्याचे स्पष्ट झाले आहे. यावेळी अजित पवार यांनी तिघांचा सन्मान होईल, अशी आशा व्यक्त केली आहे.

**काय म्हणाले अजित पवार ?**

कॅबिनेट झाल्यावर मी, एकनाथ शिंदे, फडणवीस, बावनकुळे दिल्लीत जाऊ. तिथे जागा वाटपाबाबत चर्चा होईल. त्यानंतर काय ते फायनल होईल. तिघांचा सन्मान होईल अशी पद्धतीने जागा वाटप होईल, असेही अजित पवार म्हणालेत.

**निवडणुकांचा विषय हा कोर्टात आहे**

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचा विषय हा कोर्टात आहे. आम्हाला तर निवडणुका पाहिजेत. याच सरकारला दोष देऊन चालणार नाही.कारण मागच्या सरकारमध्ये सुद्धा निवडणुका झाल्या नाहीत. सुप्रीम कोर्टात प्रश्न प्रलंबित आहे,

त्यामुळे यावर भाष्य करणे योग्य नाही. बारामतीचा उमेदवार त्यांनी जाहीर केला, स्वागत आहे. महायुतीचा निर्णय झाला की,आम्ही पण आमचे उमेदवार जाहीर करु, असंही अजित पवार म्हणाले.



### जागा वाटपावरुन अजित पवार गट नाराज

महायुतीतील जागावाटपात फारच कमी जागा मिळत असल्याने अजित पवार गटामध्ये नाराजीनाट्य पाहायला मिळत आहे. अजित पवार गटातील अनेक नेते नाराज असून त्यांनी जागा वाढवून मिळाव्यात यासाठी वरिष्ठांवर दबाव टाकण्यास सुरुवात केली होती. मात्र, अजित पवार दिल्लीतील बैठकीत किती जागा मागतात आणि त्यांच्या वाट्याला किती जागा येतात? याकडे सर्वांचे लक्ष आहे.

**कोणाला किती जागा मिळणार ?**

महायुतीच्या जागावाटपात भाजपकडून अजित पवार आणि एकनाथ शिंदे यांच्या गटाला केवळ विनींग सीट दिल्या जाणार असल्याची चर्चा आहे. भाजपला ३४ ते ३५, अजित पवार यांच्या गटाला ३ ते ४ तर शिंदे गटाला १२ ते १३ जागा मिळणार असल्याची शक्यता वर्तवली जात आहे. काही दिवसांपूर्वी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह महाराष्ट्रात आले तेव्हापासून जागा वाटपाच्या हालचालींना वेग आलाय.

**पाहिजेत**

**राजदंड**

२५ वर्ष सातत्याने प्रसिद्ध होणाऱ्या दै राजदंडसाठी पश्चिम महाराष्ट्रात **तालुका व जिल्हा प्रतिनिधी** नेमणे आहे. आपल्या परिसराची भौगोलिक, सामाजिक, राजकीय, आर्थिक जाण असलेल्या, मराठी भाषेवर प्रभुत्व असलेल्या आणि जनसंपर्क असलेल्या उमेदवारांनी संपर्क साधावा. उमेदवार पदवीधर असावा. पत्रकारिता व जनसंपर्क विषयात प्रशिक्षण घेतलेल्या व माध्यम क्षेत्रात किमान अनुभव असलेल्या उमेदवारांना प्राधान्य

संपर्क: rajdand.pune@gmail.com

# नीरा डावा कालव्यावरील ३५ व ३६ क्रमांकाच्या वितरिकेवरील शेतकरी आक्रमक

## तातडीने पाण्याचे आवर्तन न सोडल्यास आंदोलनाचा इशारा



**बारामती :** निरा डावा कालव्यावरील ३५ व ३६ क्रमांकाच्या वितरिकेला गेल्या अनेक दिवसांपासून शेतीसाठी पाणी न सोडल्याने या वितरिकेच्या कार्यक्षेत्रातील पिके वाळून चालली असल्याने या भागातील शेतकरी आक्रमक झाले असून पाटबंधारे विभागाने तातडीने पाण्याचे आवर्तन न सोडल्यास तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा शेतकऱ्यांनी दिला आहे.

या वितरिकांना येत्या दोन दिवसात पाणी सोडावे, अशी आग्रही मागणी शेतकऱ्यांनी केली आहे.

गेले तीन महिने झाले, या भागातील शेतकऱ्यांना पाणी मिळून सध्या पाण्याची बिकट अवस्था असून जनावरांना चारा व पिण्यासाठी पाणी उपलब्ध होत नाही. तसेच शेतातील पिके करपून चालली आहेत .त्यामुळे येथील शेतकरी हवालदिल झाला असून राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते भाऊसाहेब सपकळ व छत्रपती सहकारी साखर कारखान्याचे माजी अध्यक्ष अविनाश घोलप यांच्या नेतृत्वाखाली इरिगेशन बंगला सणसर येथे मोर्चा काढून रस्ता रोको करण्यात येणार असून या मोर्चाला सर्वपक्षीय नेत्यांनी पाठिंबा दर्शवलेला आहे . यामध्ये संभाजी ब्रिगेडचे जिल्हाध्यक्ष प्रशांत पवार, स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे राजेंद्र सपकळ, सपकळवाडी गावचे माजी सरपंच शिवाजी सपकळ, सपकळवाडी येथील युवा नेते विनोद सपकळ, भाजप किसान मोर्चाचे अजित सपकळ, आप्पा काळू सपकळ, रामभाऊ बोबडे,तसेच अनेक शेतकरी उपस्थित होते. पदाधिकाऱ्यांनी या सर्व भूमिकेला पाठिंबा दर्शवला आहे ,हजारोंच्या संख्येने मोर्चामध्ये सहभागी होणार असल्याचे सांगितले. या संदर्भात या भागातील पदाधिकारी व शेतकऱ्यांनी पाटबंधारे वसाहत कार्यालयातील अधिकाऱ्यांच भेट घेऊन आवर्तन सोडण्याची आग्रही मागणी केली.त्यामुळे येत्या दोन दिवसांमध्ये पाणी न मिळाल्यास शेतकऱ्यांचा तीव्र उद्रेक होऊ शकतो, असे भाऊसाहेब सपकळ यांनी सांगितले.

# वसंतदादा पाटील नागरी पतसंस्थेची निवडणूक बिनविरोध

**नारायणगाव :** पुणे जिल्ह्यातील अग्रगण्य असलेल्या व जुन्नर तालुक्यातील महत्त्वाची आर्थिक उलाढाल होत असलेल्या नारायणगाव येथील वसंतदादा पाटील नागरी सहकारी पतसंस्थेच्या संचालक मंडळाची निवडणूक नुकतीच बिनविरोध पार पडली. सन २०२३ - २४ ते सन २०२८ - २९ या पंचवार्षिक सालाकरीता ही निवडणूक घेण्यात आली.

निवडणूक निर्णय अधिकारी सचिन सरसमकर यांनी निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून काम पाहिले.

या पंचवार्षिक निवडणुकी पश्चात संचालक मंडळाच्या संमतीने अध्यक्षपदी दीपक अशोकआप्पा खैरे यांची बिनविरोध निवड करण्यात आली. उपाध्यक्षपदी राजेंद्र पांडुरंग पाटे तर सचिवपदी सदानंद बबनराव खैरे यांची बिनविरोध निवड करण्यात आली आहे.

दरम्यान संचालक म्हणून विलास वाजगे, प्रभाकर तट्टू, अशोक पाटे, संग्राम फुलवडे, एकनाथ शेटे, सुनील भुजबळ, प्रशांत अशोकआप्पा खैरे, डॉ. पंकज वाव्हळ, डॉ. रवींद्र गिरी, अभय कोठारी, मीना भोर व रूपाली पाटे यांची बिनविरोध निवड करण्यात आली.

नवीन पदाधिकाऱ्यांचे निवडणूक निर्णय अधिकारी सचिन सरसमकर, संतोष भुजबळ यांच्यासह संस्थापक गणपतराव फुलवडे, संस्थेचे मार्गदर्शक संतोष नाना खैरे, मुख्य कार्यकारी अधिकारी सचिन तोडकरी यांनी अभिनंदन केले आहे.





# कृषीदुतांनी शेतकऱ्यांसाठी जीवामृत बनवण्याचे प्रात्यक्षिक केले सादर

## सेंद्रियखत म्हणून कृषी दुतांनी बनवलेले जीवामृत शेतकऱ्यांना फायदेशीर

**नारायणगाव :** मांजरवाडी (ता. जुन्नर) येथील शेतकऱ्यांना प्रत्यक्ष त्यांच्या बांधावर जाऊन आधुनिक शेतीचे महत्व व सेंद्रिय शेती कशा पद्धतीने फायदेशीर आहे याविषयीची प्रात्यक्षिके कृषी दुतांनी नुकतीच सादर केली.

ग्रामीण कृषि कार्यानुभव कार्यक्रमांतर्गत पद्मभूषण वसंतदादा पाटील कृषी महाविद्यालय, आंबी येथील कृषीदुतांनी आदर्श गाव मांजरवाडी येथे जीवामृत कसे बनवावे या विषयावर प्रात्यक्षिक शेतकऱ्यांसमोर सादर केले. शेतकऱ्यांमध्ये जीवामृताचे महत्त्व यासंबंधी जनजागृती व्हावी यासाठी हा उपक्रम राबवण्यात आला.

जीवामृत हे जैविक खतांमध्ये सर्वात महत्त्वाचे आहे व त्याच्या वापरामुळे पिकांची वाढ जोमदार होते व उत्पन्नात वाढ होते अशी माहिती कृषीदूतांनी दिली.

मातीतील उपयुक्त जिवाणूंची संख्या देखील मोठ्या प्रमाणात वाढते.

जीवामृत हा रासायनिक खतांसाठी एक उत्तम पर्याय आहे अशी माहिती कृषी दूत अथर्व देशमुख,अनुराग वानखडे, केशव गोगडे, तपन जैन यांनी दिली. या कृषी विद्यार्थ्यांना मुख्याध्यापक भाग्योदय खोब्रागडे , कार्यक्रम समन्वयक अविनाश खरे, एच पी खेडकर यांचे मार्गदर्शन लाभले.



# खोकुर्ले येथे भरवस्तीत पुन्हा बिबट्या घुसला

## नागरिक भयभीत वनविभागाला निवेदन

**गगनबावडा :** खोकुर्ले ता.गगनबावडा येथे बिबट्याने भरवस्तीत लक्ष्मण येसबा पाटील यांच्या घराबाहेर कुत्र्यावर हल्ला करून कुत्रे फस्त केले आहे.त्यामुळे नागरिकांच्यात भीतीचे वातावरण पसरले आहे.याबाबतच खोकुर्ले ग्रामस्थांच्या वतीने वनविभागाला निवेदन देण्यात आले.

खोकुर्ले येथे भरवस्तीमध्ये लक्ष्मण येसबा पाटील व यशवंत तुकाराम पाटील यांच्या घराभोवती बिबट्याने फिरून कुत्र्यावर हल्ला केला आहे. गावामध्ये गेले महिना- दोन महिने बिबट्याने अनेक पाळीव कुत्र्यावर हल्ला करून त्यांना ठार मारले आहे.शनिवारी उत्तर रात्री खोकुर्ले गावातील शेतकरी लक्ष्मण येसबा पाटील यांच्या घराबाहेरील असलेल्या पाळीव कुत्र्यावर बिबट्याने हल्ला करून हा कुत्रा फस्त केला आहे. खोकुर्ले येथील भरवस्तीत बिबट्या घुसल्याने आम्ही जगायचे कसे असा प्रश्न नागरिकांना पडला आहे. या आगोदर गावातील शेतमजूर धोंडीराम गायकवाड यांच्या घराजवळील गोठ्यामध्ये बिबट्याने शेळी ठार मारून नेली आहे. त्याचबरोबर बाळू कसबले यांच्या गोठ्यामध्येही बिबट्याने प्रवेश करून कुत्र्यावर हल्ला केला होता.

याबाबत वनविभागाने लावलेल्या सी.सी.टी.व्ही.मध्ये बिबट्या स्पष्ट दिसत आहे. बिबट्याच्या मानवी वस्तीमध्ये प्रवेशाने नागरिक व शेतकरी वर्गामध्ये घाबरट पसरली आहे. खोकुर्ले गावामधील शेतकरी व दुधव्यवसाय करणारे नागरिक या चिंतेने धास्तावले असून जनावरांची वैरण व शेतकाम करण्यास घाबरत आहेत.यामुळे आपण याबाबत गांभीर्याने लक्ष घालून सदर बिबट्या पकडून योग्य ठिकाणी सोडण्यात यावा. बिबट्याने नागरिकावर हल्ला केल्यास जीवितहानी होण्याची शक्यता नाकरता येत नाही.याबाबत आपण तात्काळ कार्यवाही करून बिबट्यास पकडून योग्य ठिकाणी सोडण्यात यावा.याबाबतचे निवेदन वनकर्मचारी संग्राम पाटील ,पांडुरंग पाटील,आनंदा पाटील यांना ग्रामस्थानच्या वतीने देण्यात आले. यावेळी सरपंच सुनिता कांबळे ,रामचंद्र पाटील,बाजीराव पाटील,रंगराव पाटील, संदीप पाटील, प्रकाश पाटील ,पोलिस पाटील कैलास इंजर ,विष्णू पाटील ,अजित पाटील,रामचंद्र हरुकले , बाबुराव कांबळे यासह नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# महिलांनी आपल्या आरोग्याकडे लक्ष द्यावे : डॉ सुप्रिया देशमुख

**शिरोली :** सर्वच महिलांना एकाच वेळी अनेक जबाबदाऱ्या पार पडण्याची कसरत करावी लागते. त्यासाठी आपली प्रकृती उत्तम असणे गरजेचे असून महिलांनी आपल्या आरोग्याकडे सर्वप्रथम लक्ष द्यावे असे आवाहन सिव्हिल सर्जन डॉ. सुप्रिया देशमुख यांनी केले. डी वाय पाटील कृषी व तंत्र विद्यापीठ तळसंदे येथे आयोजित जागतिक महिला दिन कार्यक्रमात प्रमुख पाहुण्या म्हणून त्या बोलत होत्या.



डॉ. सुप्रिया देशमुख म्हणाल्या, स्त्रीला घर, समाज आणि कामाच्या ठिकाणी वावरताना वेगवेगळ्या भूमिकांमध्ये काम करावे लागते. स्त्री ही प्रत्येक घराचा कणा असते. त्यामुळेच आपण आपल्या आरोग्याकडे विशेष लक्ष दिले पाहिजे. वयाच्या तिशीनंतर वेगवेगळ्या आरोग्य तपासण्या करून घ्याव्यात. स्वतः साठी वेळ द्यावा. योग्य आहार आणि झोपही महत्वाची आहे. त्याचबरोबर योगासने व इतर व्यायाम प्रकार यासाठी महिलांनी वेळ द्यावा असे आवाहन त्यांनी केले. महिलांमध्ये आढळणारे विविध आजार त्याची लक्षणे व उपचार घ्यावयाची काळजी, हार्मोन संतुलन याबद्दलही त्यांनी माहिती दिली.

कुलगुरू डॉ. के. प्रथापन यांनी जागतिक महिला दिनाचे महत्त्व विषद केले. महिलांनी प्रत्येक क्षेत्रात आपले वर्चस्व सिद्ध केले आहे. प्रत्येकाच्या जीवनात महिलांचे स्थान महत्वाचे आहे. तिचा कायमच सन्मान राखणे व तिला प्रोत्साहन देणे हे समाजाची कर्तव्य असल्याचे सांगितले. कुलसचिव डॉ. जे. ए . खोत यांनी प्रमुख पाहुण्यांची ओळख करून दिली. महिला दिन एका दिवसापुरता साजरा न करता वर्षभर महिलांचा आदर सन्मान राखला पाहिजे असे त्यांनी सांगितले.

यावेळी असोसिएट डीन डॉ. शुभांगी जगताप यांच्यासह महिला प्राध्यापक, कर्मचारी, विद्यार्थिनी उपस्थित होत्या. कुलपती डॉ. संजय डी पाटील, संस्थेचे उपाध्यक्ष आमदार सतेज डी. पाटील, विश्वस्त आमदार ऋतुराज पाटील, कार्यकारी संचालक डॉ. ए . के. गुप्ता यांचे मार्गदर्शन व प्रोत्साहन लाभले.

# भागेश्वर महाराजांच्या यात्रेत धावले ३०४ बैलगाडे

## अडीच टन खिचडी, केळी व राजगिरा लाडूचा महाप्रसाद



**नारायणगाव :-** वारूळवाडी व नारायणगावचे ग्रामदैवत श्री भागेश्वर महाराज देवाच्या यात्रेनिमित्त नुकत्याच आयोजित करण्यात आलेल्या बैलगाडा शर्यतीत ३०४ बैलगाडे सहभागी झाले . सतत दोन दिवस उत्साहात साजरा झालेल्या भागेश्वर महाराज यात्रेत भागेश्वर मंदिराला आकर्षक रोषणाई करण्यात आली होती. या यात्रोउत्सवानिमित्त दिनांक ७ व ८ रोजी भव्य बैलगाडा शर्यतीचे आयोजन करण्यात आले होते. अशी माहिती देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष प्रकाशमामा पाटे यांनी दिली.

शिवरात्रीनिमित्त पहाटे भागेश्वर महाराजांना अभिषेक करून सकाळी ८ वाजता मांडव डहाळे मिरवणूक काढण्यात आली. यादिवशी मंदिरामध्ये खिचडी, केळी, राजगिरा लाडू वाटप करण्यात आले असून हजारो भाविक भक्तांनी दर्शनाचा व महाप्रसादाचा लाभ घेतला. याशिवाय जागतिक महिला दिनानिमित्त ११ भाग्यवंत महिलांना नथ व पैठणी साड्या देण्यात आल्या.

बैलगाडा शर्यतीमध्ये प्रथम क्रमांकासाठी ८१ हजार रुपये, फळीफोड गाड्यासाठी ११ हजार रुपये, द्वितीय क्रमांकासाठी ७१ हजार रुपये, फळीफोड ७ हजार रुपये, तृतीय क्रमांकासाठी ६१ हजार रुपये, फळीफोड साठी ५। हजार रुपये तसेच फायनलमध्ये येणाऱ्या गाड्यासाठी ४ मोटारसायकली, ६ बैलगाडे, २ फॅन, २ इन्व्हर्टर बॅटरी, ४ सायकली, २ मिक्सर, २ कुट्टी मशीन, २ गिरणी, २ शेतातील पेट्रोल पंप, २ कुलर अशी लाखो रुपयांची बक्षिसे ठेवण्यात आली होती. या यात्रेमध्ये पहिल्या दिवशी आर्वी पिंपळगाव येथील नानासाहेब महादेव गुळवे यांच्या गाड्याने प्रथम क्रमांक पटकावीला. पेठ येथील महेंद्र कडूसकर व गुंजाळवाडी येथील नथुशेठ मनाजी मुळे यांच्या गाड्याने द्वितीय क्रमांक मिळविला तर संतोष दत्तात्रय शिंदे यांच्या गाड्याने तृतीय क्रमांक मिळविला. घाटाचा राजा म्हणून शरद गंगाधर पाचपुते, प्रशांत मच्छिंद्र डोंगरे यांच्या गाड्याने नंबर मिळविला असल्याची माहिती देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष प्रकाश पाटे, वारूळवाडीचे सरपंच राजेंद्र मेहेर व यात्रा कमिटीचे अध्यक्ष आशिष फुलसुंदर यांनी दिली.

# कोजिमाशि पतसंस्थेच्यावतीने 'मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा' पुरस्कार प्राप्त शाळांचा मानपत्र देऊन गौरव

**शिरोली :** महाराष्ट्र शासनाच्या वतीने आयोजित केलेल्या 'मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळा' या अभियानात तालुका स्तर, व शहर स्तरावर प्रथम,द्वितीय व तृतीय क्रमांक प्राप्त झालेल्या शाळांना कोल्हापूर जिल्हा माध्यमिक शिक्षण सेवक सहकारी पतसंस्थेच्या वतीने मानपत्र ,कोल्हापुरी फेटा,भिंतीवरील घड्याळ या स्वरूपात गौरविण्यात आले. कोल्हापूर जिल्हा मुख्याध्यापक संघात संपन्न झालेल्या या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे सीईओ कौस्तुभ गावडे होते .कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माध्यमिक उपशिक्षणाधिकारी अजय पाटील होते.



याप्रसंगी बोलताना कौस्तुभ गावडे म्हणाले, 'मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळा' या स्पर्धेमध्ये सर्वच शाळांनी अत्यंत चांगल्या पद्धतीने आपली शाळा सुंदर बनविण्याचा खूप चांगला प्रयत्न केला. शाळांचे अंतरंग व बाह्यरंग सुंदर बनविण्याबरोबरच उत्तम निकाल, स्वच्छता, बोलक्या भिंती, वृक्षारोपण व नावीन्यपूर्ण उपक्रम अशा सर्वच बाबीत जिल्ह्यातील सर्वच शाळांनी खूप चांगली तयारी करून सहभाग घेतला. या स्पर्धेत तालुकास्तरावर व शहर स्तरावर क्रमांक आलेल्या शाळांचे मन:पूर्वक अभिनंदन. पुरस्कार प्राप्त शाळांचा आदर्श इतर शाळांनीही घेऊन आपली शाळा सर्व पातळीवर स्वच्छ व सुंदर बनवावी असा संदेश गावडे यांनी दिला.

कार्यक्रमाचे अध्यक्ष उपशिक्षणाधिकारी अजय पाटील म्हणाले, खऱ्या अर्थाने या स्पर्धेमुळे जिल्ह्यातील शाळांना नवचैतन्य प्राप्त झाले आहे. यशस्वी शाळांना मानपत्र देऊन या शाळांच्या पाठीवर कौतुकाची थाप कोजिमाशि पतसंस्थेने दिली आहे. असे गौरव उद्गार अजय पाटील यांनी काढले. उपस्थितांचे स्वागत व प्रास्ताविक कोजिमाशि पतसंस्थेचे तज्ञ संचालक शिक्षक नेते दादासाहेब लाड यांनी केले. अत्यंत कमी कालावधीमध्ये हा कार्यक्रम आयोजित करून या सर्व शाळांच्या पाठीवर कौतुकाची थाप देण्यात येत आहे. सर्वच पुरस्कार प्राप्त शाळांचे मनःपूर्वक अभिनंदन दादासाहेब लाड यांनी केले. यावेळी पुरस्कार प्राप्त शाळा प्रथम क्रमांक आदर्श गुरुकुल विद्यालय व जुनिअर कॉलेज पेठ वडगाव, द्वितीय रयत गुरुकुल विद्यानिकेतन कुंभोज ,तृतीय डी के टी ई हायस्कूल इचलकरंजी, गगनबावडा तालुका प्रथम माध्यमिक विद्यालय सांगशी,द्वितीय माध्यमिक विद्यालय शेळोशी ,तृतीय दत्ताजीराव मोहिते पाटील माध्यमिक विद्यालय तिसंगी, राधानगरी तालुका प्रथम श्री नागेश्वर हायस्कूल राशिवडे बुद्रुक, द्वितीय श्री किसनराव मोरे हायस्कूल सरवडे, तृतीय आ.नामदेवराव भोईटे हायस्कूल कसबा वाळवे ,पन्हाळा तालुका प्रथम वारणा विद्यालय वारणानगर, द्वितीय संजीवनी विद्यालय सोमवार पेठ पन्हाळा, तृतीय आ.ब.सरनोबत गर्ल्स हायस्कूल आसुर्ले पोर्ले, करवीर तालुका प्रथम आदर्श हायस्कूल भामटे ,द्वितीय श्रीमती बी के पाटील हायस्कूल गिरगाव , तृतीय आंबूबाई पाटील इंग्लिश मीडियम स्कूल गोकुळ शिरगाव ,शाहूवाडी तालुका प्रथम श्री निनाई माध्यमिक विद्यालय करुंगळे, द्वितीय दत्त सेवा विद्यालय तुरुकवाडी, तृतीय नागेश्वर हायस्कूल वारूळ, भुदरगड तालुका प्रथम जवाहर हायस्कूल निळपण, द्वितीय श्रीमंत छात्र जगतगुरु विद्यालय मठगाव, तृतीय कुमार भवन पुष्पनगर, शिरोळ तालुका प्रथम देशभक्त रत्नाप्पाण्णा कुंभार हायस्कूल राजापूर, द्वितीय ताराबाई अण्णासाहेब नरंदे हायस्कूल नांदणी ,तृतीय चैतन्य पब्लिक स्कूल अब्दुललाट, कागल तालुका प्रथम सरलादेवी माने हायस्कूल कागल, द्वितीय मळगे विद्यालय मळगे बुद्रुक, तृतीय दूधगंगा विद्यालय धरणग्रस्त वसाहत कागल, कोल्हापूर शहर प्रथम कोल्हापूर पब्लिक स्कूल कोल्हापूर, व्दितीय सेंट झेवियर्स हायस्कूल कोल्हापूर,तृतीय दादासाहेब मगदूम हायस्कूल कोल्हापूर अशा ३८ शाळांना मानपत्र देऊन गौरविण्यात आले.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिवाजी पाटील यांनी केले. आभार कोजिमाशि पतसंस्था चेअरमन उत्तम पाटील यांनी मानले.

# कर्नाटकातून पंढरपूर तालुक्यात येतोय कोट्यवधी रुपयांचा गुटखा अन्न औषध विभागाची डोळेझाक

**पंढरपूर :** पंढरपूर शहराच्या दक्षिण भागातील जवळपास सर्वच महामार्गावर गुटख्याची ने-आण आणि पार्सल करण्याचा काळा बाजार तसेच साठा करून त्याची विल्हेवाट लावणे असे गोरख धंदे राजरोस सुरू आहेत. पंढरपूर तालुक्याची दर महिन्याची गुटख्याची उलाढाल अंदाजे चार कोटींच्या घरात आहे. विशेष म्हणजे ज्या पोलीस कर्मचाऱ्यांच्या हद्दीत सर्वात जास्त महामार्ग त्या पोलीस कर्मचाऱ्याचा सर्वात मोठा फायदा, असा अप्रत्यक्ष निकष असल्याने महामार्गावरील बीट घेण्यासाठी पंढरपूर पासून सोलापूर पर्यंत सर्वांची चढाओढ असते. गुटख्याच्या मंथली मधून या दोन्ही पोलीस ठाण्याचे उखळ दर महिन्याला पांढरे होत असल्याने गुटखा कारवाई करण्यामध्ये अन्न व औषध



विभागाबरोबर पोलीस प्रशासन देखील अनभिज्ञ बनले आहे.

पंढरपूर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील परिसरात दररोज गुटख्याची आवक-जावक सुरू असते. पंढरपूर शहरात तीन ते चार दुकानात होलसेल मालाचा पुरवठा मंथली देऊन हा गोरख धंदा राजरोसपणे चालू असुन गुटख्याच्या आहारी गेलेल्या युवकांचे दुर्दैवच म्हणावे लागेल .

**सर्वात सुरक्षित बाजारपेठ मंगळवेढा आणि पंढरपूर !!**

**पंढरपूर तालुक्याची बाजारपेठ गुटख्यासाठी सर्वात सेफ बाजारपेठ बनत चालली आहे. पंढरपूर तालुक्याची दर महिन्याची गुटख्याची उलाढाल अंदाजे चार कोटींच्या घरात आहे. त्यामुळे पोलीस अधीक्षक शिरीष सरदेशपांडे, पोलीस उपाधीक्षक संकेत देवळेकर यांनी गुटख्याच्या तस्करीची पाळेमुळे खणून काढण्यासाठी स्थानिक गुन्हे शाखेला गुटख्यावर कारवाईच्या सूचना देणे क्रमप्राप्त बनले आहे.**

शेजारीच कर्नाटक राज्य लगत असल्यामुळे पंढरपूर, मंगळवेढा पोलीस ठाण्याच्या हद्दीतील गावे गुटख्याचे प्रवेशद्वार बनत आहेत. कर्नाटकातून मोठ्या प्रमाणात गुटखा आणून त्याचा साठा मंगळवेढा तालुक्यातील गावांमध्ये करून त्याची गाववाईज नेटवर्क करून विल्हेवाट लावण्यासाठी मंगळवेढा तालुका केंद्रबिंदू बनले आहे.

पंढरपूर शहरात जरी गुटखा विक्री जास्त नसली तरी तालुक्याच्या बहुतांश ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणात गुटखा साठा करणे आणि विक्री करणे हा गोरख धंदा चांगलाच स्थिरावला आहे. अन्न व औषध प्रशासनाने पकडलेल्या गुटख्याच्या वाहनासमोर फोटो काढणे इतपतच काम पंढरपूर आणि मंगळवेढा पोलिसांच्या कायदा व सुव्यवस्थेचे पाठीराखे करत आहेत. हे गुटखा होलसेल स्टॉकिस्टांचे सुदैव आणि गुटख्याच्या आहारी जाणाऱ्या युवकांचे दुर्दैव म्हणावे लागेल.

मालक, मुद्रक, प्रकाशक नरेश व्ही. देसाई यांनी सरस्वती प्रिंटिंग प्रेस, १६ मंगळवार पेठ, सातारा येथे मुद्रित करून, रामकमल बिल्डिंग, ७, रामकृष्ण कॉलनी, सिव्हिल हॉस्पिटल रोड, सातारा येथून प्रकाशित केले. संपादक : नरेश व्ही. देसाई. फोन : ९९६०३५०९९९, Email : rajdand.wmgmail.com, RNI NO. : ७२१०५/९९
Owner, Printer, Publisher Naresh V. Desai. Printed at Saraswati Printing Press, 16 Mangalwar Peth, Satara. Published from Ramkamal Building, 7, Ramkrishna Colony, Civil Hospital Road, Satara. Editor : Naresh V. Desai. Phone : 9960350999, Email : rajdand.wmgmail.com, RNI NO. : 72105/99

# कोयनेतील पाणीसाठा १० टीएमसीने वाढणार



## नाम माध्यमातून धरणातील गाळ काढण्याच्या मोहिमेचा शुभारंभ

**मुख्यमंत्री शिंदे म्हणाले, कोयना धरणातील गाळ काढण्यात येणार आहे. या गाळाचा फायदा कांदाटी खो-यातील १०५ गावांना होणार आहे. तर बांबू लागवडीचेही अनेक फायदे आहेत. त्यापासून अनेक वस्तू बनवता येतात. या भागात साडेसहा हेक्टरवर बांबू लागवड होणार आहे. त्यामुळे दरे हे जिल्हयातील पहिलेच गाव ठरणार आहे.**

**सातारा :** कोयना धरणातून गाळ काढण्याचा शुभारंभ झाला आहे. यासाठी मोठया प्रमाणात मशिनरी आणि मनुष्यबळही लागणार आहे. गाळ असल्याने धरणात पाणीसाठा कमी होतो. पण आता गाळ काढल्यानंतर १० टीएमसी पाणीसाठा वाढणार आहे. तसेच वाहून जाणारे पाणीही थांबेल असा विश्वास मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी व्यक्त केला.

दरे, ता. महाबळेश्वर येथे गाळमुक्त धरण आणि गाळयुक्त शिवार योजनेचा शुभारंभ बांबू मुल्यवर्धन केंद्राचा लोकार्पण सोहळा तसेच टसर वन्य रेशीम शाश्वत रोजगार व व वन संवर्धन प्रकल्पाचे उद्घाटन अशा तिहेरी कार्यक्रमात एकनाथ शिंदे बोलत होते.

यावेळी ज्येष्ठ अभिनेते नाना पाटेकर, उद्योगमंत्री उदय सामंत, पालकमंत्री शंभूराज देसाई, आमदार शिवेंद्रसिंहराजे भोसले, आमदार मकरंद पाटील, जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, मुख्य कार्यकारी अधिकारी याशनी नागराजन, पोलीस अधिक्षक समीर शेख, उपवनसंरक्षक अदिती भारद्वाज आदी उपस्थित होते.हा प्रकल्प परिसरातील इतर गावातही करण्यात येणार आहे. कारण जंगल भागातील शेतकरी महिला आणि युवकांसाठी टरस रेशील शेती नाविन्यपूर्ण शाश्वत उद्योग आहे. झाडाची लागवड रोजगार हमी योजनेतून करता येते. तसेच पाणी आणि औषध फवारणीचीही गरज नाही. त्यामुळे सहयाद्री पर्वत रांगांमधील शेतक-यांसाठी टरस रेशीम शेती एक वरदान ठरणार आहे.

## शिरोळ येथील रमाबाई हाऊसिंग सोसायटीमध्ये जागतिक महिला दिन मोठ्या उत्साहात

**शिरोळ :** शिरोळ येथील रमाबाई हाऊसिंग सोसायटी मध्ये जागतिक महिला दिन मोठ्या उत्साहात संपन्न झाला यावेळी उखाणे स्पर्धा वक्तृत्व स्पर्धा संगीत खुर्ची लिंबू चमचा आदि कार्यक्रमांचे नेटके नियोजन करण्यात आले होते त्यास उस्फुर्त महिलांनी प्रतिसाद दिला

प्रारंभी डॉ बाबासाहेब आंबेडकर व क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन व दीप प्रज्वलन माजी जि प सदस्या सौ इंद्रायणी पाटील माजी उप नगराध्यक्ष जयश्री धर्माधिकारी व सौ कुमुदिनी कांबळे यांच्या हस्ते प्रज्वलन करण्यात आले यावेळी बोलताना सौ इंद्रायणी पाटील म्हणाल्या डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी महिलांचा हिताकरता जे संविधानामध्ये कायदे कानून केले आहे त्याचा परिपूर्ण फायदा आता महिलांना होत आहे भगवान गौतम बुद्ध व छत्रपती शिवाजी महाराज यांच्या स्त्रीमुक्तीच्या चळवळीचा परिपाक संविधानामध्ये दिसून येतो असे सांगून त्यांनी विविध क्षेत्रात महिलांनी केलेला नेत्र दीपक प्रगतीचा आढावा घेतला तर मा उपनगराध्यक्ष जयश्री धर्माधिकारी म्हणाल्या महिलांनी मुलांच्यावर चांगले संस्कार केले पाहिजे तरच एक आदर्श पिढी जगाच्या स्पर्धेला सामोरे जाऊ शकेल महिलांना स्वातंत्र्य म्हणजे बेफिकिरीची वागणूक नव्हे तर स्वातंत्र्याचा लाभ उठून आपली प्रगती साधली पाहिजे टीव्ही मोबाईल मुळे मुलींच्यावर विपरीत परिणाम होत आहेत त्याला आळा घालण्याचे काम आपण केले पाहिजे तर यावेळी सौ कांबळे यांनी स्त्रीमुक्ती चळवळीचा आढावा घेऊन माता जिजाऊ रमाई भिमाई यांनी केलेल्या त्यागाच्या आठवण करून दिल्या याप्रसंगी शेवंता बनसोडे यांच्या परिवाराच्या वतीने महिलांना भेटवस्तू देण्यात आल्या.



## क्राइम रेट कमी होण्यासाठी हडपसर पोलीस स्टेशनचे विभाजन झाले पाहिजे : संतोष पांढरे

**हडपसर :** हडपसर पोलीस स्टेशन हे शहरातील मोठे क्षेत्रफळ हद्द असलेले पोलीस स्टेशन असून वाढती गुन्हेगारी व क्राइम रेट कमी होण्यासाठी हडपसर पोलीस स्टेशनचे विभाजन झाले पाहिजे,फुरसुंगी व काळेपडळ नवीन पोलीस स्टेशन प्रस्ताव तयार आहे , हडपसर भाग हा झपाट्याने वाढत आहे,हडपसरच्या पोलीस स्टेशन हद्दीत जवळपास पंधरा लाखापर्यंत पब्लिक वाढलेली आहे, आमच्याकडे जेमतेम जवळपास दोनशेच्या आसपास पोलीस स्टाफ आहे इतक्या मोठ्या लोकसंख्येला पोलीस बळ कमी पडते, हद्द मोठी असल्याने सर्वच ठिकाणी पोलीस पोहंचणे शक्य होत नाही, सर्वांनी दक्ष राहून पोलीसांना मदत करा ,येथील कारभार रामभरोसेच चाललेला आहे , नागरीकांनी पोलिसांबरोबर काम करायला हवे, समाजात सर्व धर्मीय गुण्यागोविंदाने राहाण्यासाठी तुम्हा सर्वांची साथ असणे आवश्यक आहे, येणारे सण, उत्सव , जयंती साजरी करताना धार्मिक तेढ निर्माण होणार नाही याची दक्षता घेऊन सण उत्सव आनंदाने साजरा करा , समाजात कांही समाजकंटक चांगले असलेले वातावरण दूषित करण्याचा प्रयत्न करीत असतील तर त्यांना रोखा, कुठल्याही सोशल मिडियावरील अथवा विविध माध्यमातून पसरविणाऱ्या अफवांवर विश्वास ठेवू नका , पोलीसांना सहकार्य करा , पोलिसांच्या नियमांचे पालन करा , कुठे अवैध धंदे अथवा कांही अक्षेपार्ह घडत असल्यास पोलीसांना कळवा,पोलीस सदैव तुमच्या पाठीशी आहे असे मत हडपसर पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संतोष पांढरे यांनी हडपसर पोलीस स्टेशनने आयोजित केलेल्या शांतता बैठकीत मंडळाच्या कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करताना ते बोलत होते.



बैठकीस विविध पक्षाचे , मंडळाचे, संस्थेचे हिन्दु, मुस्लिम, ख्रिश्चन, बौद्ध समाजाचे प्रतिनिधी उपस्थित होते.

## शिवाजी विद्यापीठाच्या वतीने २९ वे आंतरविद्याशाखीय राष्ट्रीय राज्यशास्त्र परिषदेचे आयोजन

**कुरुंदवाड :** भारतीय राज्यघटनेच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त येथील सहकारभूषण एस. के. पाटील महाविद्यालयात बुधुवार व गुरुवार (दि. १३ ते १४) दोन दिवस शिवाजी विद्यापीठाच्या वतीने २९ वे आंतरविद्याशाखीय राष्ट्रीय राज्यशास्त्र परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. विद्यापीठांतर्गत प्रत्येक महिविद्यालयातील राज्यशास्त्राचे प्राध्यापक, संशोधक सहभागी होणार आहेत. येथील माजी नगराध्यक्ष जयराम पाटील यांच्या हस्ते बुधवारी या परिषदेचे उदघाटन होणार असून कोल्हापूर न्यू कॉलेजचे प्राचार्य व्ही. एम. पाटील हे परिषदेचे अध्यक्ष असल्याची माहिती या विभागाचे उपाध्यक्ष शारदा कोठावळे व महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ सुनिल चव्हाण यांनी पत्रकार परिषदेत दिली.

या चर्चासत्रात भारतीय राज्यघटनेची वाटचाल आणि आव्हाने, भारतातील विरोधी पक्ष आणि राजकारण, राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय राजकीय सध्य परिस्थिती, बदलेले राजकीय स्वरूप या विषयावर मंथन होणार आहे.

या परिषदेत जेष्ठ विचारवंत डॉ. अशोक चौसाळकर, राजकीय अभ्यासक किशोर बेडक्याळे, इतिहास संशोधक श्रीमंत कोकाटे यांचे विविध विषयांवर मार्गदर्शन होणार आहे. शिवाय राज्यशास्त्रातील विविध विषयांवरील सादर करण्यात आलेल्या प्रबंधाचे वाचन केले जाणार आहे.

परिषदेच्या समारोपात आंतरराष्ट्रीय राजकीय अभ्यासक डॉ. चंद्रकांत भांगे यांनी भारत व शेजारील देशांशी संबंध, भारतातील जी २० परिषदेचे फलित, आंतरराष्ट्रीय आर्थिक संघटना, आशियायी देशांमधील लोकशाहीपुढील आव्हाने या विषयांवर मार्गदर्शन आणि चर्चा होणार आहे. बुधवारी व गुरुवारी अशा दोन दिवस होणार्या या परिसंवादात सर्वांनी सहभागी होण्याचे आवाहन कोठावळे यांनी केले आहे.

यावेळी प्रा. सारीका माळगे, प्रा. राहूल नागुर्डेकर, प्रा. राजू शिंगे उपस्थित होते.

# चारा हाय तर पाणी नाय

## जनावरे विकण्याची वेळ



**सायकलवरून चारा नेताना सासवड (माळी बेंद) येथिल शेतकरी पोपट रासकर.**



**शासनाने टंचाईग्रस्त गावांना टॅंकरने पाणी पुरवठा चार महिन्या पासुन केला आहे. जनावरांना पाणी मिळत आहे मग चारा ही टंचाईग्रस्त गावांना शासनाने चारा डेपोच्या माध्यमातून देवुन पशुधन वाचवावे.**

> **गत वर्षापासून नाही ज्वारी पेरली पाऊस झाला नाही ज्वारीचे बाटुक झाले जनावरांना मुठ मुठ घालुन जनावरे जगवली आहे शासनाकडे चार महिन्यापासुन चारा डेपोची मागणी केली आहे अजुन सुरू झाला नाही आता चारय वाचुन जनावरांचा हंबरडा सुरु होणार आहे**
>
> **- अमोल रासकर**
>
> **ग्रामपंचायत सदस्य, सासवड ता. फलटण**

**आदर्की :** फलटण तालुक्यातील आदर्की महसुली मंडलातील काही गावात चारा पाणी मुबलक प्रमाणात उपलब्ध नसल्याने खरिप व रब्बी हंगामातील पिके वाया गेली रब्बी हंगामातील ज्वारीचा बाटुक फडा संपल्याने पाणी आटले चारा संपला तरी शासन चारा डेपो छावण्या सुरू करत नसल्याने जनावरे कवडीमोल दराने विकण्याची वेळ शेतकरयावर आली आहे.

फलटण तालुक्यातील आदर्की महसुली मंडलात धोम बलकवडी कालव्यामुळे विहिरी भरण्या ऐवजी कायमच्या आटल्याचे चित्र आदर्की खुर्द आळजापुरच्या केंजळे मळया त दिसत आहे.

गत वर्षी पासुन खरिप व रब्बी हंगामात पाऊस झाला नसल्याने पेरणी कमी प्रमाणात झाली धोम बलकवडी कालव्याचे आवर्तन सुटले त्यावर चारा पिके घेतली त्या मध्ये मोठ्या काही शेतकर्यांनी मुरघास बनवला.

त्यामुळे एक दोन जनावरे असणारया शेतकरी यांची जनावरे ऊसाच्या वाडयावर तग धरून होती पण आता साखर कारखान्यानी गळीत हंगाम आटोपता घेतल्या मुळे जनावरांना चारा म्हणून मिळणारे वाढे मिळेत नसल्याने चारयाचा प्रस्न गंभीर झाला आहे. ज्वारीचा कडबा ( वैरण ) पाच हजार रुपये शेकडा आहे म्हणजे पन्नास रुपयाला एक पेंडी आहे त्यामुळे एका जनावराला दिवसाला तीन पेंडया लागतात दिवसाला दिडशे रुपये खर्च होत आहे

पशुखादयाचे दर वाढले आहेत पण दुधाचे दर पंचवीस रुपायापर्यत खाली आले आहेत शासनाने पाच रुपये अनुदान जाहिर केले आहे परंतु अजुन शेतकरयाच्या खात्यात जमा झाले नाही.

आदर्की महसुली मंडलात मुळीकवाडी सासवड हिंगणगाव वाघोशी आदर्की कापशी परिसरात चारा टंचाई जाणवू लागली आहे. सासवड येथील शेतकर्यांनी तीन महिन्या पुर्वी चारा डेपोची मागणी महसुल विभागाकडे केली आहे. गत महिन्यात महसुल विभागाकडून पाहणी केली आहे पण अजुन चारा छावण्या किंवा चारा डेपो सुरू न झाल्याने चारया विना जनावरे हंबरडा फोडत असल्याने चारा डेपो सुरू करून शासनाने शेतकरयाचे पशुधन वाचवावेत अशी मागणी होत आहे.

# मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा अभियान

**राजगुरुनगर :** दोंदे (ता. खेड) येथील भैरवनाथ विद्यालयाने मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा स्पर्धेत खेड तालुका स्तरावर प्रथम क्रमांक पटकावला असून शाळा तीन लाखांच्या बक्षिसाची मानकरी ठरली आहे.



या अभियानामध्ये परिसर स्वच्छता, सुसज्ज इमारत, बोलक्या भिंती, बालसंसद, कला-क्रीडा क्षेत्रातील नैपुण्य, परसबाग, अमृत कलश, औषधी वनस्पतींची लागवड, कचरा व्यवस्थापन, वर्ग सजावट, माजी विद्यार्थी मेळावे, विविध स्पर्धांमधील सहभाग व प्राविण्य अशा विविध मुद्द्यांच्या आधारे हे परीक्षण करण्यात आले होते. शाळा परिसर विकासासाठी माजी विद्यार्थ्यांनी आर्थिक मदत केली.

या संदर्भात विद्यालयाच्या मुख्याध्यापिका डॉ. नंदा भोर म्हणाल्या,' विद्यालय सतत विविध उपक्रम राबवित असल्याने या अभियानात त्याचा फायदा झाला. आठवी शिष्यवृत्ती व एनएमएमएस परीक्षांमध्ये दरवर्षी विद्यार्थी चमकत आहेत. चित्रकला परीक्षेचा शंभर टक्के निकाल लागला असून जिल्हा परिषद बालनाट्य स्पर्धेत विद्यालयाने प्रथम क्रमांक मिळविला आहे. विविध जिल्हास्तरीय तसेच राज्यस्तरीय निबंध, वक्तृत्व, चित्रोळी, इन्स्पायर ॲवार्ड, विज्ञान रंजन स्पर्धांमध्ये विद्यार्थ्यांनी यश मिळविले आहे. या अभियानामध्ये दोंदे शिक्षण प्रसारक मंडळाचे पदाधिकारी, आजी माजी विद्यार्थी, ग्रामस्थ व पालकांचे ही मोठे सहकार्य मिळाले'

मुख्याध्यापिका भोर यांच्या मार्गदर्शनाखाली शिक्षक के.डी. पोखरकर, के. डी. भगत, वर्षा कुमठेकर, शोभा भोंगाळे, उषा लोहकरे, रोहिणी कदम, प्रिया कोहीनकर, चंद्रकांत बो-हाडे, सुदाम निळकंठ, सलीम सय्यद, लक्ष्मण जाधव यांनी परिश्रम घेतले.

या उपक्रमामध्ये दोंदे शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष मारुतराव बारणे, उपाध्यक्ष ड. पी. यु. कोहिनकर, केशवराव बनकर, सचिव नंदकुमार कोहिनकर, संचालक आनंदराव कदम, भरत उढाणे, शामराव बारणे, खंडेराव करंडे, मच्छिंद्र सुकाळे, किसन लगड, प्रवीण मेहेत्रे, डॉ. राजेश बनकर, सुदर्शन कदम यांनी मार्गदर्शन व सहकार्य केले.

# हिंगणगाव धरणाने गाठला तळ

## गाळ काढण्याची मागणी

**फलटण :** पश्चिम भागातील आदर्की - तरडगाव ओढयावर हिंगणगावच्या हददीत बुरसुंडी नावाच्या शिवारात १९७२ मध्ये माती धरणामुळे हजारो हेक्टर क्षेत्र ओलिताखाली आले आहे परंतु गत वर्षी पासुन पावसाने पाठ फिरवली असल्याने बावन्न वर्षात पहिल्यांदाच कोरडे पडणार असल्याने हिंगणगाव परिसरात पाणी टंचाई जाणवू लागली आहे तरी तलावातील गाळ काढण्याची मागणी ग्रामस्थांनी निवेदनाद्वारे केली आहे

गत वर्षा पासुन पावसाने पाठ फिरवल्याने फलटण पश्चिम तालुक्यातील हिंगणगाव गावच्या हददीत बुरसुंडी धरणातील पाण्यांनी तळ गाठल्याने . हिंगणगाव येथे दिवसा आड पाणी येत आहे आदर्की बु ।। येथे टॅंकर व्दारे पाणी पुरवठा केला जात आहे, , परहर बुद्रुक येथे टॅंकरने पाणी पुरवठा केला जात आहे टाकुबाईचवाडी कापशी सासवड हिंगणगाव आदर्की बु ।।आदी गावांना शेतीच्या पाण्यासाठी घरणाच्या पाण्याचा फायदा होतो. मात्र, यंदा पाऊस न पडल्याने हे धरण पाण्याविना कोरडे पडणार असल्याने हजारो हेक्टर क्षेत्र वाया जाणार आहे



**हिंगणगाव ता . फलटण येथील बुरसुंडी धरणातील पाण्याने तळ गाठला आहे**

धरण बावन्न वर्षात पहि त्यांदाच पुर्ण कोरडे पडणार असल्याने धरणात गाळच मोठ्या प्रमाणात साचल्याने पाणीसाठा कमी होत आहे. त्यामुळे हिंगणगाव ग्रामपंचायतीने संकल्प फाउंडेशन, कमिन्स, नाम फाउंडेशन या संस्थांना गाळ काढण्यासाठी ठराव देऊन समक्ष भेटी दिल्या आहेत.

**आदर्की - हिंगणगाव ओढयावर पंधरा किलोमीटर अंतरात हणमंतवाडी येथे १९५२ मधे ततकालीन बांधकाम मंत्री श्रीमंत मालोजीराजे नाईक निंबाळकर यांच्या प्रयत्नातून धरण बांधण्यात आले त्यानंतर हिंगणगाव येथे दुसरे धरण बुरसुंडी येथे माती धरण बांधले व त्यावर पोट पाटाने शेकडो एकर क्षेत्र ओलीताखाली आणले होते परंतु गाळ जादा प्रमाणात साठल्याने पाणी साठ्यात घट झाली आहे**

> **हिंगणगाव येथिल बुरसुंडी धरणातील पाणी साठा खालवला. आहे धरणात मोठया प्रमाणात गाळ साठला आहे. तरी संबधीत विभागाच्या अधिकाऱ्यांनी धरणाची पाहणी करून गाळ काढण्याचे अंदाज पत्रक तयार करून धरणातील गाळ काढावा व धरणातील पाणी साठा वाढवावा**
>
> **- डॉ पदमराज भोईटे**
>
> **माजी संचालक श्रीराम सहकारी साखर कारखाना फलटण**

संकल्प फाउंडेशनने या धरणातील गाळ काढण्यासाठी हिरवाकंदीलही मिळाला आहे. मात्र, त्यासाठी त्यांनी त्या कामाचे अंदाजपत्रक मागवले आहे. मात्र, हे धरण नीरा उजवा कालव्याच्या अंतर्गत असल्याने फलटण नीरा कालव्याच्या संबंधित अधिकाऱ्यांनी या धरणाची पाहणी करून अंदाजपत्रक देणे गरजेचे आहे. त्यासाठी लोणंदचे अभियंता श्री. थोरात यांनी या धरणाला भेट देऊन त्याची पाहणी केली आहे.तरी संबधीत विभागाने तातडीने गाळ काढण्यास परवानगी देवुन धरणातील गाळ काढण्याची मागणी होत आहे.

## भटक्या विमुक्त जातीच्या नागरिकांसाठी ११ मार्चला विशेष शिबिर

**पंढरपूर -:** भटके विमुक्त व आदिवासी जातीमधील नागरिकांना शासनाच्या विविध योजनांची माहिती आणि लाभ देण्यासाठी विशेष शिबीर आयोजन केले आहे.

या शिबिराचे आयोजन दि. ११ व १२ मार्च २०२४ रोजी जुनी वडार गल्ली, समाज मंदीर, पंढरपूर येथे केले असुन नागरिकांनी या शिबिराचा लाभ घ्यावा, असे आवाहन तहसिलदार सचिन लंगोटे यांनी केले आहे.

या समाजातील नागरिकांना शासनाच्या विविध योजनांचे लाभ मिळण्यासाठी प्रामुख्याने जन्म दाखला, आधारकार्ड, मतदार ओळखपत्र, शिधापत्रिका, आयुष्यमान भारत आरोग्य पत्रिका, जात प्रमाणपत्र यांची गरज असते ते मिळताना विविध समस्या व अडचणींचा सामना करावा लागतो. या अडचणी सोडविण्यासाठी विशेष शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

# गांधी दर्शन शिबीराला चांगला प्रतिसाद

## गांधीजी हे मानवतेचे प्रतिक:डॉ.शशिकला राय

**पुणे :** महाराष्ट्र गांधी स्मारक निधी आणि युवक क्रांती दलाच्या वतीने रविवार, दि. १० मार्च २०२४ रोजी सकाळी १० ते सायंकाळी ६ या वेळेत 'गांधी दर्शन' शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. कोथरूड येथील गांधी भवनच्या दुस-या मजल्यावरील सभागृहात हे शिबीर पार पडले. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या हिंदी विभागप्रमुख डॉ. शशिकला राय यांनी 'गांधीजीं सोबत मैत्री ' विषयावर मार्गदर्शन केले.डॉ. कुमार सप्तर्षी यांनी ' सत्याग्रहशास्त्र ' या विषयावर मार्गदर्शन केले, तर मुंबईचे पत्रकार सोहित मिश्रा यांनी ' महात्मा गांधी









आणि आजचे वर्तमान ' या विषयावर मार्गदर्शन केले.' 'गांधी दर्शन' विषयावरचे हे अकरावे शिबीर होते.

डॉ. उर्मिला सप्तर्षी, अन्वर राजन,डॉ.प्रवीण सप्तर्षी,सुदर्शन चखाले (प्रकल्प प्रभारी) ,संदीप बर्वे (विश्वस्त सचिव, महाराष्ट्र गांधी स्मारक निधी ) , जांबुवंत मनोहर ( राज्य कार्यवाह, युक्रांद ),अप्पा अनारसे(संघटक,युक्रांद),सचिन पांडुळे (अध्यक्ष, युवक क्रांती दल पुणे शहर) आदी मान्यवर उपस्थित होते.नीलम पंडित यांनी संविधानाच्या प्रास्ताविकेचे वाचन केले.

डॉ.शशिकला राय म्हणाल्या,' आपलयाला स्वातंत्र्य जसे समजले नाही, तसेच गांधीजी समजले नाहीं. कारण ते समजून घेण्याची मानसिकता नाहीं. गांधी ही व्यक्ती नाहीं तर प्रतीक आहे.गांधी बनणे ही एक प्रक्रिया आहे. स्वतः गांधी ही प्रक्रिया जगले. जगभरात अनेक व्यक्ती या प्रक्रियेतून मानवतेचे नेते झाले.रक्ताचा एकही थेंब न सांडता जगात काही करता येते, हे गांधीजींनी दाखवून दिले.प्रचारातून असत्याला सत्य बनवता येत नाही. ज्याला प्रेम समजते अशा कोणालाही गांधी समजून सांगणे सोपे आहे. नव्या पिढीला समजून सांगण्या इतके गांधी संभाषण स्नेही आहेत'.हिंदी आणि मराठी साहित्यातील गांधीजींबद्दलच्या लेखनाचा मागोवाही डॉ.शशिकला राय यांनी या भाषणात घेतला.

डॉ.सप्तर्षी म्हणाले, ' गांधीजी हे व्यक्ती म्हणून समजून घेण्याबरोबरच त्यांचे अन्याय विरुद्ध लढणे हे अभ्यासणे गरजेचे आहे. सत्याग्रह हे शास्त्र म्हणून त्यांनी विकसित केले. ही त्यांनी जगाला दिलेली देणगी आहे.अहिंसा ही दुबळ्यांची नसते, इतरांना मारण्याची ताकद असून जे मारत नाहीत, ती शूरांची अहिंसा असते.मुस्लिमबहुल भाग पाकिस्तान झाला. हिंदूबहुल भाग धर्मनिरपेक्ष देश बनला, या कारणातून गोडसे याने गांधीजींची हत्या झाली.तरीही गांधी विचार अमर झाला आणि जगभर जिवंत राहिला'.

---

## हर हर महादेव च्या गजरात वारणा दूध संघावर महाशिवरात्री महोत्सव

## महारुद्राभिषेक २१५ दाम्पत्याच्या हस्ते धार्मिक विधी,२१ हजार भाविकांनी घेतला महाप्रसादाचा लाभ

**वारणानगर :** येथील श्री वारणा दूध उत्पादक प्रक्रिया संघ संचलित शिवपार्वती मंदीर देवस्थान ट्रस्ट मार्फत संघाच्या तात्यासाहेब कोरेनगर येथील शिवपार्वती मंदीरात आयोजीत महाशिवरात्री महोत्सव ॐ नमो शिवाय, हर हर महादेव च्या गजरात उत्साहात पार पडला.

पहिल्या दिवशी लघ-रुद्र अभिषेक, महारुद्राभिषेक व लघुरुद्र स्वाहाकार सोहळा असे धार्मिक विधी पार पडले यानिमीत्ताने २१ हजारावर भाविकांनी श्री च्या दर्शनाचा व महाप्रसादचा लाभ घेतला.

वारणा दूध संघाचे अध्यक्ष,मॅनेजिंग ट्रस्टी आमदार डॉ. विनय कोरे, संघाचे कार्यकारी संचालक व ट्रस्टी मोहन येडूरकर यांच्यासह संघाचे २१५ सपत्नीक कर्मचारी यांच्या शुभहस्ते महाशिवरात्री निमित्त आयोजीत धार्मिक विधी शुक्रवारी पहाटे ४ वाजता पार पडले. यामध्ये संघाच्या संचालिका नाजीया मुल्ला या महाशिवरात्री महापूजेस बसल्या होत्या.मुस्लिम दाम्पत्याच्या शुभहस्ते ही पूजा व अभिषेक संपन्न झालेने सर्वधर्मसमभावाचे दर्शन झाले.

यावेळी सकाळपासून शिवपार्वती मंदिरात हजारो भाविक



भक्तांनी दर्शनासाठी गर्दी करीत ओम नमः शिवाय,हर हर महादेवाचा गजर व भक्तिमय वातावरणाने परिसर दुमदुमला होता.

दुपारी आमदार डॉ. विनय कोरे व सावित्री महिला औद्योगिक संस्थेच्या अध्यक्षा शुभलक्ष्मी कोरे, ट्रस्टी मोहन येडूरकर, मुग्धा येडूरकर व अधिकारी, दाम्पत्यांच्या हस्ते महारुद्रजप अभिषेक व महारुद्र स्वाहाकार धार्मिक विधी विविध राज्यांतून आलेल्या पुरोहितांमार्फत पार पडले.

भगवान श्री महादेवांची आकर्षक मूर्ती उत्सव स्थळी बसवण्यात आली होती.हि मूर्ती भाविकांचे लक्ष वेधून घेणारी ठरली.भव्य मंडप व्यवस्था,फुलाची आकर्षक सजावट,विविधरंगी विद्युत रोषणाई आदि व्यवस्थेमुळे महोत्सव मोठ्या उत्साहात पार पडला.

या सोहळ्याचे वारणा मिल्क या यूट्युब चॅनलवरून थेट लाइव्ह प्रक्षेपण करण्यात आले. दुपारी मंदिरात बालभाव सरिता यांची शिवआराधना हा सुमधुर गायनाचा श्रवणीय कार्यक्रम पाहून भाविकांनी मुलामुलींचे कौतुक केले. शिवपार्वती देवस्थान ट्रस्टने महाशिवरात्री महोत्सवाचे नेटके नियोजन केले होते. यावेळी वारणा बँकेचे अध्यक्ष निपुण कोरे, वारणा भगिनी मंडळाच्या उपाध्यक्षा स्नेहा कोरे, जोतिरादित्य कोरे, सावित्री महिला संस्थेच्या उपाध्यक्षा मुग्धा येडूरकर, संघाचे उपाध्यक्ष एच.आर. जाधव, संघाचे संचालक यावेळी संघाचे संचालक शिवाजी कापरे,अभिजित पाटील,प्रदीप देशमुख,माधव गुळवणी, व्ही.टी. पाटील,शिवाजी जंगम,चंद्रशेखर बुवा,नाजीया मुल्ला,एन.आर.पाटील,मिलिंद हिरवे,यांचेसह सर्व संचालक मंडळ,अकौटस मॅनेजर सुधीर कामेरीकर, मार्केटींग मॅनेजर अनिल हेर्ले,शरद शेटे,प्रमोद कोळी, अविनाश पाटील,अभिजित भोसले,आदी अधिकारी व कर्मचारी भाविक मोठ्या संखेने उपस्थित होते.

**२१ हजार भाविकांनी घेतला महाप्रसादाचा लाभ : येडूरकर**

महाशिवरात्रीनिमित्त आयोजित केलेल्या महाप्रसादाचा तब्बल २१ हजार भाविकांनी लाभ घेतला.

मॅनेंजिंग ट्रस्टी व दूध संघाचे अध्यक्ष आमदार डॉ.विनय कोरे यांच्या हस्ते शुक्रवारी मध्यरात्री महाआरती झाली. शनिवारी सकाळी ९ वाजता संघाचे उपाध्यक्ष एच.आर. जाधव, कार्यकारी संचालक मोहन येडूरकर व संचालकांच्या प्रमुख उपस्थितीत महाप्रसाद वाटपाचा शुभारंभ झाला यावेळी दशना सह महाप्रसाद घेण्यासाठी वारणानगर सह परिसरातील भाविक भक्तांनी हजारोंच्या संख्येने सकाळ पासून गर्दी केली होती.

यामध्ये महिला भक्तांची गर्दी लक्षणीय होती. तब्बल २१ हजारांहून अधिक भाविकांनी या महाप्रसादाचा लाभ घेतला असल्याचे ट्रस्टी मोहन येडूरकर यानी सांगून महोत्सव यशस्वीरीत्या पार पाडल्याबद्दल सर्व विभागप्रमुख व कर्मचारी यांचे अभिनंदन केले.

---

## गुरेघर अतिक्रमणावर हातोडा अनेक कास पठारावर तोडगा..?

**सातारा :** सातारा जिल्हा प्रशासन व त्यांचे प्रमुख जिल्हाधिकारी यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे सातारा जिल्ह्याच्या दौऱ्यावर असतानाच गुरेघर या ठिकाणच्या तीन अतिक्रमणावर हातोडा मारला आहे. पण, कास पठारावर असणाऱ्या अतिक्रमणाबाबत तोडगा काढण्यात येत असल्याची दबक्या आवाजात चर्चा सुरू आहे.याबाबत जर कोणी न्यायालयात गेले तर नेमकी कुणाची बाजू घ्यावी ? असा प्रश्न सुद्धा काहींना पडला आहे. खरं म्हणजे सातारा जिल्ह्यामध्ये अधिकृत बांधकाम करण्यासाठी लागणाऱ्या आवश्यक परवानगीशिवाय अधिकृत बांधकाम करता येत नाही. अनेक दिवस वाट पाहून लोकशाही मानणारे व सरळ मार्गी लोक परवानगी मिळाल्यानंतरच रितसर पायाभरणी करून बांधकाम सुरू करतात. आणि काही महाभाग तर एखादी मोक्याची जमीन दिसली की त्या ठिकाणी बांधकाम करून पुन्हा हे बांधकाम अधिकृत दंडात्मक कारवाई भरून आपल्या नावावर करतात. यासाठी नगरपालिका, जिल्हा प्रशासन, पोलीस यंत्रणा, अतिक्रमण विभाग व काही सामाजिक कार्यकर्ते आणि माहिती अधिकारावर माहिती गोळा करणारे कलेक्टर यांचे मात्र याबाबत दुर्लक्ष होत असते.

महाबळेश्वर तालुक्यातील मेटगुताड भोसे ,अवकाळी, भिलार, दांडेकर, पार व महाबळेश्वर परिसरात अनेक ठिकाणी अतिक्रमण पाडण्याबाबत स्थगिती आदेश आहेत .वर्षानुवर्षी हे आदेश व त्याबाबत आव्हान दिले जात आहे. परंतु गुरेघर येथील नागपूरवाल्यांचे बांधकाम सुट्टी असताना सुद्धा जमीनदोस्त केले जात आहे. ही आनंदाची बाब आहे . कायदा व सुव्यवस्था राखण्यास जिल्हा प्रशासन यशस्वी ठरले. याबद्दल त्यांचे मनापासून आभार मानले पाहिजे.

या ठिकाणची तीन बांधकामे हे हिमालयाचे



टोक असले तरी अनेक बेकायदेशीर बांधकामे आजही महाबळेश्वरच्या थंड हवेच्या ठिकाणी गारव्याचा आस्वाद घेत आहेत. कारण त्यांच्याकडे रिफ्रिजरेटर, एयर कंडीशन व कायदे तज्ञांची फौज आहे. जोडीला पैशाच्या गुलाबी गालीचे असल्यामुळे त्यांना पाहिजे तशी उब व गारवा मिळतो.

एकूणच सातारा जिल्ह्यामध्ये अनाधिकृत बांधकाम यांची यादी जर काढली तर किमान सुमारे दीड हजार अनाधिकृत बांधकामे व त्याबाबतचे खटले न्यायालय व जिल्हाधिकारी कार्यालयात तारीख पे तारीख असा कायदेशीर बाबींची पडताळणी करून व प्रत्येक मुद्दे व गोष्टीवर लक्ष ठेवून कामकाज होत आहे.

काही अतिक्रमण यांनी तर २५ वर्ष आपल्या साध्या इमारतीतील कचरा सुद्धा हलवून दिलेला नाही. मग बांधकाम पाडणे दूरच आहे. सातारा जिल्ह्यात जर पाहिलं तर अनेक अर्धवट काम असलेल्या इमारती स्पष्टपणाने सामान्य माणसांना दिसतात. पण, नगरपालिका, ग्रामपंचायत, नगरपंचायत, जिल्हा प्रशासन व अतिक्रमण विभाग यांना मात्र त्या दिसत नाहीत. याचे कुणाला आता नवल वाटत नाही. कारण, विनोदाने बोलले जाते. मोदी है तो मुमकीन है... याचा अर्थ मोदी म्हणजे सबका साथ सबका विकास असा सुद्धा प्रचार केला जात आहे. हा कुठला राजकीय विषय नाही तर सामान्यांचा विषय आहे.

पहाटे गुरेघर या ठिकाणचे बांधकाम पाडताना खूप मोठे शौर्य केलेले आहे. कायद्याचे पालन केले आहे. असे काहींना वाटत आहे. ज्या ठिकाणी अतिक्रमण आहे. ते दाखवण्याचा किंवा त्याबाबत चर्चा करण्याची तसदी कुणी घेत नाही. हेच तर सातारकरांचे मोठं दुखणं आहे. आता गुरेघर या ठिकाणचे पाडण्यात येत असलेले अतिक्रमण चार दिवस पाहावे लागेल. पण कास पठारावरील मोठ्या दिमाखात उभे असलेले अतिक्रमण आता अनेकजण सेल्फी पॉईंट म्हणून सेल्फी काढून पाठवत आहे. पण, त्यावर हातोडा केव्हा पडणार? की तोडगा काढण्यासाठी चर्चासत्र आयोजित करणार?असा मार्मिक प्रश्न अभ्यासू व जेष्ठ नागरिक विचारात आहेत. त्याचे उत्तर कोण देणार? हाच खरा प्रश्न आहे.

कास पठारावरील अतिक्रमण लवकरात लवकर पाडून कायदा हा सर्वांसाठी एक समान आहे. अशा पद्धतीने समान नागरी कायदा हा खरा राबवून त्यानंतर त्याचा प्रचार करणे म्हणजे खरी लोकशाही हे दाखवण्याचे धारिष्ट लोकप्रतिनिधी, जिल्हा प्रशासन, न्यायव्यवस्था व प्रसारमाध्यम करतील अशी आशा व्यक्त करण्यात येत आहे.

गुरेघर ता महाबळेश्वर येथील याच इमारतीवरती हातोडा पडला मात्र कास पठार त्या अडचण नशीबवान ठरत आहे

---

## स्वच्छ पाणी,जलपुनर्भरण,चांगले शिक्षण गावच्या सर्वांगीण विकासाचा मूलभूत पाया

### पाणलिंग यात्रेनिमित्त भास्कर पेरे -पाटील यांचे व्याख्यान

वावरहिरे- पिण्यासाठी स्वच्छ पाणी,सांडपाणी,जलपनर्भरण ,दर्जेदार शिक्षण, आरोग्याच्या सोयीसुविधा ह्याच गावच्या विकासाचा मुलभूत पाया आहे. प्रत्येकाने स्वतःची क्षमता ओळखून सामाजिक कार्यात सक्रिय होऊन गावच्या प्रगतीचे वाटेकरी व्हावे. असे प्रतिपादन पाटोदा गावचे आदर्श सरपंच तथा ससंद आदर्श ग्राम समिती सदस्य भास्कर पेरे-पाटील यांनी व्यक्त केले.

पाणलिंग पालखी कावड यात्रेनिमित्त ग्रामपंचायत कार्यालयाच्या वतीने जि.प.प्राथमिक शाळासमोर आदर्श सरपंच पेरे पाटील यांचे व्याख्यान पार पडले. यावेळी सरपंच शैला राऊत,उपसरपंच शिवाजी भोसले तसेच विविध गावचे सरपंच उपसरपंच,ग्रामसेवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पुढे बोलताना श्री पेरे-पाटील म्हणाले की,गावाचा विकास साधायचा असेल तर आप आपसातील मतभेद बाजुला सारा. लोकांना फुकट योजनांची सवय लागल्यामुळे आळशी प्रवृत्ती वाढली.दुस-यावर अवलंबुन राहण्याची सवय लागली.त्यामुळेच नागरिक आपले कर्तव्य विसरुन गेली.



### तुम्ही पहिल्यांदा द्या;मग नंतर भांडा

**नागरिकांनी घर पट्टी भरली तरच ग्रामविकास निधी जमेल या रक्कमेतुनच गावातील रस्ते,नाली,लाईट,व्यवस्थीत होतील. म्हणुन नागरिकांनी ग्रामपंचायतला कर भरणा करावा.हे पाहिजे ते पाहिजे ते द्या करत बसण्यापेक्षा तुम्ही पहिल्यांदा ग्रामपंचायतीला द्या.नंतर ग्रामपंचायतीला भांडा. ग्रामनिधीतूनच विकासाची गंगा निर्माण करता येते.**

गावातील नागरिकांनी ग्रामपंचायतचा कर भरला तर खासदार,आमदाराच्या फंडाची वाट पाहण्याची गरज भासणार नाही. घरातील सांडपाणी जमिनीत मुरवा,पाणी जपुन वापरा,झाडे लावा,शाळा महत्वाची आहे. आपल्या मुलांबाळावर जरा लक्ष द्या .आपली मुलं शिकली तरच कुटुंबाचे व समाजाचे कल्याण होणार आहे.शाळेकडे पालकांनी लक्ष दिले पाहिजे.

शासकीय योजनावर अवलंबुन न राहता गावात उद्योग उभारा. आर्थिक विकास होईल.नुसतं निवडणुका घेऊन राजकारण करत बसल्याने गावाचा विकास होणार नाही.सारे एकत्र या चांगला वेळ देणारा व्यक्ती निवडुण द्या. पाच वर्ष तो चांगले काम करेल.पुढील पाच वर्षात तुमच्या गावात विकासाची गंगा पोहचलेली असेल.असा आशावाद श्री पेरे -पाटील यांनी व्यक्त केला.

यावेळी गावातील नागरिक, महिला,विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

---

## पंढरपूर येथे श्री संत नामदेव कथासोहळ्याचे आयोजन

**पंढरपूर :** पंढरपूर येथे शिंपी समाज बांधवांच्या वतीने श्री संत नामदेव (हिंदी भाषेत )कथा सोहळ्याचे आयोजन लवकरच करण्यात आले आहे.

यानिमित्त येथे बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीच्यास अध्यक्षस्थानी संत नामदेव महाराज यांचे १६ वे वंशज मुकुंद महाराज नामदास हे होते.यावेळी कथा सोहळ्याचे आयोजक सुरत येथील नामदेव सेवा समिती अध्यक्ष जगदीश परिहार यांनी सांगितले की पंढरपूर येथे नामदेव महाराज भक्त





कथा सोहळा २० सप्टेंबर २०२४ ते २४ सप्टेंबर २०२४ पर्यंत आयोजित करण्यात आला आहे. ही कथा सांगण्यासाठी संत श्री १००८ रामप्रसादजी महाराज (बडा रामद्वारा) जोधपुर येथील महाराज येणार आहेत. हा कथा सोहळा यशस्वीपणे पार पडण्यासाठी एक कमिटी तयार करण्यात येणार आहे. या कमिटीद्वारे भारतातील बेंगलोर चेन्नई बिकानेर पंजाब दिल्ली यासह संपूर्ण राज्यातील सर्व पोट जातीतील शिंपी बांधव उपस्थित राहणार आहेत.

---

## आंबेगाव तालुक्याच्या पूर्व भागातील शेतकऱ्यांची चिंता वाढली

### मीना नदीवरील केटी (बंधारे) पडले कोरडे





**वळती :** तालुक्याच्या पुर्व भागात मीना नदीवरील कोल्हापूर पद्धतीच्या बंधाऱ्यातील पाणीसाठा संपल्याने शेतीपिकांना ताण बसू लागला आहे. परिणामी, आंबेगाव तालुक्याच्या पूर्व भागातील शेतकऱ्यांची चिंता वाढली आहे.

रांजणी, वळती, नागापूर, शिंगवे या गावांना मीना नदीचे पात्र वरदान ठरले असून, येथे सात कोल्हापूर पद्धतीचे बंधारे आहेत. यंदा या परिसरात अत्यल्प पाऊस झाला. त्यामुळे मीना नदीपात्र कोरडेठाक पडले आहे. या भागातील बहुतांश शेतकरी मिना नदिच्या पाण्यावर अवलंबुन आहे . या भागातील मीना नदीवरील कोल्हापूर पद्धतीच्या बंधाऱ्यांमधील पाणीसाठा संपुष्टात आल्याने शेतीपिकांच्या पाण्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. या भागातील विहीरींनीही तळ गाठला असुन अनेक बोअरवेलही पाण्याअभावी बंद पडले आहे .

केटी बंधाऱ्यातील पाणीसाठा संपुष्टात आल्याने अनेक शेतकऱ्यांचे नदीवरील वीजपंप उघड्यावर पडले आहेत. शेतकऱ्यांनी अंतिम टप्प्यात आलेल्या पिकांना पाणी द्यायचे कुठून ? असा प्रश्न शेतकऱ्यांना पडला आहे.

परिसरातील अनेक शेतकऱ्यांचा कांदा पिक अंतिम टप्प्यात आले असुन काही शेतकऱ्यांचे उसाचे पिक तसेच मोठ्या प्रमाणावर गुरांचा चारा पिकेही आहेत. सध्या या पिकांना पाण्याची नितांत गरज आहे. आताच पाणीटंचाई निर्माण झाल्याने या पुढील काळात शेतीपिकांना पाणी द्यायचे कुठून, हा प्रश्न शेतकऱ्यांसमोर आहे.

या भागातील शेतकरी नदिच्या पाण्यावर अवलंबुन असुन सध्या पाण्याअभावी शेती पिके सुकून चालली आहे ,तरी जलसिंचन विभागाने लवकरात लवकर मीना नदीला पाणी सोडण्याची कार्यवाही करावी व तालुक्याच्या पुर्व भागातील शेतकऱ्यांची पाण्याची गंभीर समस्या सोडवावी अशी मागणी शेतकरी वर्गाकडून होत आहे .